SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE - EPABS-0091-0231-2609000 FAX NO. -0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र University WEBSITE : www.unishivaji.ac.in

**Estd : 1962**
**NAAC 'A' Grade**

**Dr. R. V. Gurav**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भक्रं. शिवाजीवि/विद्यार्थी विकास/2017–18/62 दि. 02/01/2018

मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर शिक्षण अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

विषय : 2017–2018 या वर्षाकरिता युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट स्टुंडन्ट्स कौन्सिल (विद्यापीठ पदव्युत्तर अधिविभाग विद्यार्थी मंडळ) स्थापन करण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदितच आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 कलम 99, 147 (2) (एल) व महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रं 28 (दि. 28/11/2017) तसेच संबंधीत विधीनियमानुसार सन 2017–2018 यावर्षाकरिता विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळ स्थापन करावयाचे आहे. ते खालीलप्रमाणे असेल.

1. मा. कुलगुरु – अध्यक्ष
2. संचालक, विद्यार्थी विकास – सभापती
3. संचालक, क्रिडा व शारीरिक शिक्षण –
4. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना –
5. विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभागात पूर्णवेळ शिकत असलेला व मागील वर्षाच्या पदवी परीक्षेस सर्वाधिक गुण प्राप्त केलेला प्रत्येक अधिविभागातील मा.कुलगुरुंनी नियुक्त केलेला एक विद्यार्थी
6. मा. प्र–कुलगुरुंनी नियुक्त केलेल्या दोन विद्यार्थीनी.

अ) तरी वरील मुद्दा क्रं. 5 प्रमाणे विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभाग विद्यार्थी मंडळावर विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्यासाठी आपल्या विभागातील त्याच विद्याशाखेच्या (फॅकल्टी) मागील वर्षाच्या पदवी परीक्षेतील सर्वोत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे नांव सोबत दिलेल्या नमुन्यात या विभागाकडे पाठवून द्यावे. एकापेक्षा अधिक विद्यार्थी समान पात्रतेचे असल्यास त्या सर्वांची नांवे पाठवून द्यावीत. त्यासोबत त्यांच्या मागील पदवी परिक्षेच्या गुणपत्रिकेची प्रमाणित झेरॉक्स प्रती पाठवून द्याव्यात.

शैक्षणिक गुणवत्ता ठरविताना आपल्या विद्यापीठाने पदवी परीक्षेतील विद्यार्थ्यांना श्रेणी प्रदान करण्यासाठी जे निकष विचारात घेतले आहेत, त्या निकषाचा वापर करावा. पदवी परीक्षेतील (भाग – 1, भाग – 2, भाग – 3 च्या एकूण गुणांची बेरीज विचारात घ्यावी.)

ब) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 कलम 99, व 147 (2) (एल) व महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रं. 28 (दि. 28/11/2017) तसेच विधीनियम एस (443) नुसार मा. प्र – कुलगुरु खालील उपक्रमातील प्रशिक्षणाचा सर्वसाधारण (Overall) विचार करुन विद्यापीठाच्या सर्व पदव्युत्तर अधिविभागातून दोन विद्यार्थीनींची नियुक्ती करणार आहेत

आपल्या विद्यापीठ पदव्युत्तर अधिविभाग विद्यार्थी मंडळावर ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनी सदस्यांची नियुक्ती होईल व त्यापैकी ज्यांना या मंडळावर काम करणे शक्य नाही अशा विद्यार्थी/विद्यार्थीनी सदस्यांस विद्यार्थी मंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर विधिनियम एस (448) प्रमाणे परिपत्रकावर नमूद केलेल्या वेळेपासून 24 तासाच्या आत अशा सदस्यास राजीनामा देता येतो. यासाठी दिनांक 15/01/2018 रोजी विद्यापीठ पदव्युत्तर अधिविभाग विद्यार्थी मंडळ किती वाजता स्थापन झाले ही वेळ नमुद करणे आवश्यक आहे.

## विशेष सूचना

1. शैक्षणिक गुणवत्ता.
2. राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) आणि प्रौढ शिक्षण
3. राष्ट्रीय छात्रसेना (एन. सी. सी.)
4. सांस्कृतिक कार्यक्रम
5. क्रिडा आणि
6. मा. प्र–कुलगुरुंनी नियुक्त विद्यार्थीनी प्रतिनिधी

यापैकी कोणत्याही बाबीमधून प्रतिनिधींची निवड करताना तो किंवा ती विद्यार्थी अथवा विद्यार्थीनी हे –

1. त्याच वर्गात पुनःप्रवेशित (रिपीटर) असू नयेत.
2. मागील वर्गात नापास परंतू पुढील वर्गात प्रवेश करण्यास परवानगी (ए.टी.के.टी.) दिलेले असू नयेत. तसेच
3. त्याच विद्याशाखेतील सम वर्गात किंवा त्याच अथवा इतर विद्या शाखेतील खालच्या वर्गात प्रवेश घेतलेले असू नयेत याची काळजी घ्यावी.

यासाठी आपण विद्यार्थी अथवा विद्यार्थीनीचे लगतच्या वर्षाचे मूळ गुणपत्रक पाहूनच त्यांची निवड करावी. तसेच क्र. 2,3,4,5 व 6 प्रमाणे नियुक्त केलेल्या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीपैकी किमान दोन विद्यार्थी किंवा विद्यार्थीनी हे शेडयूल कास्ट किंवा शेडयूल ट्राईब किंवा डी नोटीफाईड ट्राईब्स (विमुक्त जाती) किंवा नोमॅडीक ट्राईब्ज किंवा अदर बॅकवर्ड क्लासेस यापैकी असलेच पाहिजेत. याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
DEPT. OF MA/M.Com/M.Sc. Part – I (2016-17)
Academic Merit
Maharashtra Public
Universities Act 2016, 99, 147 (2) (*i*);
Maharashtra Ordinance No. XXVIII of 2017

| Name of the Students | Birth Date | Year of Passing | BA/B.Com/ B.Sc. Aggregate Percentage | Remarks |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

SEAL

Signature of HOD

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
PHONE - EPABS-0091-0231-2609000 FAX NO. -0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र **University WEBSITE : www.unishivaji.ac.in**

**Estd : 1962**
**NAAC 'A' Grade**

**Dr. R. V. Gurav**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भक्रं. शिवाजीवि / विद्यार्थी विकास / 2017–18 / 64 दि. 02 / 01 / 2018

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर शिक्षण अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : 2017–2018 या वर्षाकरिता युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट स्टुडंन्ट्स कौन्सिल (विद्यापीठ पदव्युत्तर अधिविभाग विद्यार्थी मंडळ) स्थापन करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

आपणास विदितच आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 व संबंधीत विधीनियमानुसार सन 2017–2018 यावर्षाकरिता विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळ स्थापन करावयाचे आहे. ते खालीलप्रमाणे असेल.

1. मा. कुलगुरु – अध्यक्ष
2. संचालक, विद्यार्थी विकास – सभापती
3. संचालक, क्रिडा व शारीरिक शिक्षण –
4. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना –
5. विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभागात पूर्णवेळ शिकत असलेला व मागील वर्षाच्या पदवी परीक्षेस सर्वाधिक गुण प्राप्त केलेला प्रत्येक अधिविभागातील मा. कुलगुरुंनी नियुक्त केलेला एक विद्यार्थी.
6. मा. प्र–कुलगुरुंनी नियुक्त केलेल्या दोन विद्यार्थीनी.

अ) तरी वरील मुददा क्रं. 5 प्रमाणे विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभाग विद्यार्थी मंडळावर विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्यासाठी आपल्या विभागातील त्याच विद्याशाखेच्या (फॅकल्टी) मागील वर्षाच्या पदवी परीक्षेतील सर्वोत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्याचे नांव सोबत दिलेल्या नमुन्यात या विभागाकडे पाठवून द्यावे. एकापेक्षा अधिक विद्यार्थी समान पात्रतेचे असल्यास त्या सर्वांची नांवे पाठवून द्यावीत. त्यासोबत त्यांच्या मागील पदवी परिक्षेच्या गुणपत्रिकेची प्रमाणित झेरॉक्स प्रती पाठवून द्याव्यात.

शैक्षणिक गुणवत्ता ठरविताना आपल्या विद्यापीठाने पदवी परीक्षेतील विद्यार्थ्यांना श्रेणी प्रदान करण्यासाठी जे निकष विचारात घेतले आहेत, त्या निकषाचा वापर करावा. पदवी परीक्षेतील (भाग – 1, भाग – 2, भाग – 3 च्या एकूण गुणांची बेरीज विचारात घ्यावी.)

ब) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 कलम 99, व 147 (2) (एल) व महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रं. 28 (दि. 28 / 11 / 2017) तसेच विधीनियम एस (443) नुसार मा प्र–कुलगुरु खालील उपक्रमातील प्रशिक्षणाचा सर्वसाधारण (Overall) विचार करुन विद्यापीठाच्या सर्व पदव्युत्तर अधिविभागातून दोन विद्यार्थीनींची नियुक्ती करणार आहेत.

1. शैक्षणिक गुणवत्ता. (मागील वर्षातील)
2. राष्ट्रीय सेवा योजना आणि प्रौढ शिक्षण कार्यक्रम सहभाग.
3. राष्ट्रीय छात्रसेनेतील (एन. सी. सी.) सहभाग.
4. सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग आणि
5. क्रिडा कार्यक्रमातील सहभाग

.....2

तरी उपरोक्त नियुक्तीसाठी सर्व उपक्रमातील प्राविण्यांचा विचार करुन सर्वसाधारणपणे सर्वोत्तम अशा आपल्या अधिविभागातील एका निवडक विद्यार्थीनींची माहिती या विभागाकडे सोबत दिलेल्या नमुन्यात पाठवून द्यावी.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने निश्चित केलेल्या तारखेस मा. कुलगुरुंच्या आदेशाप्रमाणे विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभाग विद्यार्थी मंडळावरील सदस्यांच्या नामनिर्देशनासह ते स्थापन झाल्याची घोषणा करण्यात येईल. त्यानंतर मा. कुलगुरुंनी निश्चित केलेल्या तारखेस विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभाग विद्यार्थी मंडळाच्या विद्यार्थी प्रतिनिधीमधून त्यांच्या सचिव पदासाठी निवडणूक घेण्यात येईल. ही कार्यवाही विद्यार्थी विकास विभागाकडून करण्यात येईल.

तरी आपल्या विभागातील (अ) व (ब) प्रमाणे आपण निवडलेल्या विद्यार्थी/विद्यार्थ्यीनींची माहिती दिलेल्या नमुन्यात या विभागाकडे पाठवून द्यावयाची आहे. तसेच (अ) व (ब) प्रमाणे आपण निवडलेल्या विद्यार्थी/विद्यार्थ्यीनीची सदस्यत्व निवडीच्या काळात कोणत्याही राजकीय कृती कार्यक्रमात सहभागी असणार नाही या संदर्भाचे प्रतिज्ञापत्र भरुन घेवून ते शिफारशी सोबत पाठवून द्यावे. (सोबत नमुना जोडला आहे.) आपल्या विभागातील विद्यार्थ्यांना स्टुडंन्टस् कौन्सिलच्या स्थापनेबाबतच्या प्रक्रियेची माहितीही द्यावी. ही विनंती.

आपला विश्वासू,

संचालक

विद्यार्थी विकास

टिप :– विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सन 2017–2018 या वर्षाचे प्रवेश निश्चित करतानाच उपरोक्त (अ) प्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांची माहिती घेवून ती विद्यार्थी विकास विभागास सादर करावी. एखादया कारणाने उपरोक्त 'अ' प्रमाणे निवडलेल्या विद्यार्थ्याने विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभाग विद्यार्थी मंडळ जाहीर होण्यापूर्वी आपला प्रवेश रद्द केल्यास अशा ठिकाणी दुसऱ्या विद्यार्थ्यांचे नांव निवडता येणे सोपे व्हावे म्हणून दुसऱ्या क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची उपरोक्त 'अ' प्रमाणे माहिती तयार ठेवावी व ती त्वरीत विद्यार्थी कल्याण विभागास सादर करावी. मात्र एकाच वेळी दोन नावांची शिफारस करु नये.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 कलम 99, 147 (2) (एल) व महाराष्ट्र शासन अध्यादेश कं. 28 (दि. 28/11/2017) तसेच संबंधित विधीनियमानुसार युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट्स स्टुडंन्टस कौन्सिल (विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळ) वरील मा. प्र–कुलगुरू यांनी नियुक्त करावयाच्या प्रत्येक अधिविभागातील एक याप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी सदस्यासाठी शिफारस करण्यासाठी वापरण्याचा माहिती तक्ता

अधिविभागाचे नांव :–

| अ. क्र. | विद्यार्थी / विद्यार्थीनीचे संपूर्ण नाव–आडनांव प्रथम (कृपया संक्षिप्त नांव लिहू नये) | जन्मतारीख | 2017–2018 या वर्षामध्ये ज्या वर्गात तो/ती पूर्ण वेळ शिकत आहे तो वर्ग | 2016–2017 या वर्षामध्ये विद्यार्थ्याने जी पदवी प्राप्त केली ती पदवी परीक्षा | 2016–2017 साली पदवी परीक्षेत मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी | सोबत जोडलेल्या मुळ पदवी परीक्षेची गुणपत्रिका मूळप्रत व झेरॉक्स प्रत. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त विद्यार्थी या अधिविभागात प्रवेश घेतलेल्या 2016–17 सालातील पदवी परिक्षेत मिळालेल्या गुणानुसार तो/ती वर्गात शैक्षणिक गुणवत्ता सर्वोत्कृष्ट आहे. दिलेली माहिती मी तपासून पाहिली असून ती बरोबर आहे.

टिप : सोबत जोडलेल्या यादीच्या नमुन्याप्रमाणे आपले अधिविभागातील पदवी परिक्षेच्या गुणावर आधारित एकत्रित यादी ही या फॉर्मसोबत सादर करावी.

दिनांक :

विभागाचा शिक्का

विभागप्रमुखांची सही

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 कलम 99, 147 (2) (एल) व महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रं. 28 (दि. 28/11/2017) तसेच संबंधित विधीनियमानुसार युनिर्व्हसिटी डिपार्टमेंसट स्टुडंन्टस कौन्सिल (विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळ) वरील मा. प्र–कुलगुरू यांनी नियुक्त करावयाच्या विद्यार्थीनी सदस्यांचे शिफारस करण्यासाठी वापरावयाचा माहिती तक्ता

अधिविभागाचे नांव :–

| अ. क्र. | विद्यार्थीनीचे संपूर्ण नाव–आडनांव प्रथम (कृपया संक्षिप्त नांव लिहू नये) | जन्मतारीख | 2017–2018 या वर्षामध्ये ज्या वर्गात ती पूर्ण वेळ शिकत आहे तो वर्ग | 2016–2017 या वर्षामध्ये विद्यार्थ्याने जी परिक्षा उत्तीर्ण झाली ती परिक्षा | 2016–2017 साली परीक्षेत मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी | राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस.एस) व प्रौढ शिक्षण सहभाग व प्राविण्य | राष्ट्रीय छात्रसेना (एन. सी. सी) सहभाग व प्राविण्य | सांस्कृतिक कार्यक्रम सहभाग व प्राविण्य | क्रिडा सहभाग व प्राविण्य | सोबत जोडलेल्या परिक्षेतील व इतर उपक्रमातील मुळ गुणपत्रिका व प्रमाणपत्रे (जोडलेल्या प्रतींचा तपशिल) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, 2016–17 सालात उपरोक्त विद्यार्थीनींने दाखविलेल्या परीक्षेतील शैक्षणिक गुणवत्ता, एन.एस.एस., प्रौढ शिक्षण, एन.सी.सी., सांस्कृतिक व क्रिडा उपक्रमातील कामगिरीचा सर्वसाधारण विचार करता ती .................................................................... वर्गातील विद्यार्थीनींत सर्वोत्कृष्ट विद्यार्थीनी आहे. दिलेली माहिती मी तपासून पाहिली असून ती बरोबर आहे.

दिनांक : 		विभागाचा शिक्का 		विभागप्रमुखांची सही

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संदर्भ क्र. शिवाजी वि./विद्यार्थीविकास/65 दिनांक : 03/01/2018

मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व पदव्युत्तर शिक्षण अधिविभाग,

विषय : विद्यार्थी मंडळाच्या सदस्यांनी राजकीय कृती कार्यक्रमापासून अलिप्त राहण्यासंदर्भात.

महोदय / महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 कलम 99, 147 (2) (एल) व महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रं. 28 (दि. 28/11/2017) तसेच संबंधित विधीनियमनुसार **i)** विद्यापीठ विद्यार्थी मंडळ, **ii)** विद्यापीठ पदव्युत्तर अधिविभाग विद्यार्थी मंडळ व **iii)** प्रत्येक महाविद्यालयाचे विद्यार्थी मंडळ यापैकी कोणत्याही मंडळाच्या सदस्याने राजकीय कृती कार्यक्रमात सहभागी होऊ नये असे बंधन आहे. हे बंधन या मंडळासाठी उमेदवार विद्यार्थ्याच्या लक्षात आणून देणे आणि त्या अर्थाचे प्रतिज्ञापत्र त्यांचेकडून लिहून घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात आपण कृपया खालील कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.

1. प्रत्येक उमेदवार आणि नियुक्त विद्यार्थ्याकडून भरुन घेण्याच्या प्रतिज्ञापत्राचा नमूना सोबत जोडला आहे.
2. प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी मंडळाच्या निवडीपूर्वी पात्र असणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांकडून सदर प्रतिज्ञापत्र भरुन घ्यावे.
3. विद्यापीठ विद्यार्थी मंडळाच्या सदस्यत्व निवडीसाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी मंडळाच्या सचिवांची शिफारस करीत असतांना त्यांचे नांव, प्रमाणपत्रे याबरोबरच त्याचे प्रतिज्ञापत्र देखील संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे पाठवून द्यावे. इतर सदस्यांची प्रतिज्ञापत्रे आपलेकडेच ठेऊन घ्यावीत.
4. विद्यापीठ अधिविभागप्रमुखांनी आपल्या अधिविभागातील शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्याच्या नावांची तसेच विद्यार्थीनी प्रतिनिधीसाठीच्या नावांची शिफारस करतेवेळीच हे प्रतिज्ञापत्र संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनीकडून भरुन घेऊन ते संचालक, विद्यार्थी विकास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना सादर करावे.
5. विद्यार्थी मंडळाच्या सदस्यांनी राजकीय कृती कार्यक्रमापासून अलिप्त राहणे हे कायद्याने बंधनकारक असल्याची बाब सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी. ही विनंती.

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत वरीलप्रमाणे.

# PROFORMA

To,                                                                                    Date:

----------------------------

----------------------------

----------------------------

----------------------------

Sir/ Madam,

I understand that I am eligible to be nominated on,

i) The Students' Council of University Departments and/ or,

ii) The Students' Council of the Institution/College and/ or,

iii) The Students' Council of University

to be formed under the provisions of Maharashtra Public Universities Act 2016, 99, 147 (2) (*l*); Maharashtra Ordinance No. XXVIII of 2017 (28/11/2017) and Statues S. 442 to S. 467.

In this connection, I have no hesitation in giving consent, if nominated on the aforesaid Students' Council. Further, I assure you that I will work to the best of my abilities on the Students' Council and will not engage myself in any political activities as a member of the Students' Council, during the tenure of my nomination.

Countersignature of the
Director/Principal/Head
as the case may be

Signature of the Student
(To be signed in front of the
Director/Principal/Head as the
case may be)

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE - EPABS-0091-0231-2609000 FAX NO. -0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र University WEBSITE : www.unishivaji.ac.in

**Estd : 1962**
**NAAC 'A' Grade**

**Dr. R. V. Gurav**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भक्रं.शिवाजीवि / विद्यार्थी विकास / 2017–18 / 129 दि. 04 / 01 / 2018

प्रति,

मा. अधिविभाग प्रमुख,
सर्व संबंधित पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

विषय : सन 2017–2018 या वर्षाकरिता "विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभाग विद्यार्थी मंडळ" (युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट स्टुडन्ट कौन्सील) स्थापन करण्यासाठी खालील दर्शविलेल्या (अ) व (ब) प्रमाणे अधिविभागातील विद्यार्थ्यांची माहिती पाठविणेबाबत.

संदर्भ : 1) या कार्यालयाचे जा. क्र. शिवाजी वि / विद्यार्थी विकास / 2017–18 / 62 दिनांक 02 / 01 / 2018 चे परिपत्रक
2) या कार्यालयाचे जा. क्र. शिवाजी वि / विद्यार्थी विकास / 2017–18 / 64 दिनांक 02 / 01 / 2018 चे परिपत्रक

महोदय / महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 व महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रं. 28 (दि. 28 / 11 / 2017) तसेच संबंधित विधिनियमानुसार सन 2017–2018 या वर्षाकरीता विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेकरिता मा. कुलगुरुंनी दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाची (युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट स्टुडन्ट कौन्सिलची) दिनांक 15 जानेवारी, 2018 रोजी स्थापना झाल्याचे घोषित करावयाचे आहे. त्याप्रमाणे दिनांक 15 जानेवारी, 2018 रोजी सर्व संलग्न महाविद्यालयाची विद्यार्थी मंडळे ज्या त्या महाविद्यालयाचे प्राचार्य घोषित करणार आहेत. दिनांक 15 जानेवारी, 2018 नंतर घोषित झालेले विद्यार्थी मंडळ बेकायदेशीर (Illegal) म्हणून संबोधण्यात येईल. विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाची स्थापना करीत असताना **30 सप्टेंबर, 2017** पूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचाच प्रतिनिधी म्हणून निवडताना विचार करावा.

दिनांक 15 जानेवारी, 2018 रोजी सर्व महाविद्यालयातील त्यांचे विद्यार्थी मंडळ आणि विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभागाचे विद्यार्थी मंडळ स्थापन झाल्यानंतर त्या प्रत्येक विद्यार्थी मंडळाच्या "सचिव" पदाची निवडणूक प्रकिया सुरु होईल. या सर्व सचिवामधून विद्यापीठाचे विद्यार्थी मंडळ (अधिकार मंडळ) नियुक्त करण्यात येईल.

"विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळ" स्थापन करण्यासाठी आपल्या अधिविभागाकडून उपरोक्त संदर्भीत पत्रानुसार खालील प्रमाणे माहिती मागविण्यात आली आहे.

अ. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 व महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रं. 28 (दि. 28 / 11 / 2017) तसेच संबंधित विधीनियम नुसार मा. कुलगुरुंनी नियुक्त करावयाच्या शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे / विद्यार्थीनींचे एक नाव.

(प्रत्येक पदव्युत्तर अधिविभागातील प्रथम वर्ष एम. ए. / प्रथम वर्ष एम. एस्सी., प्रथम वर्ष एम. कॉम अथवा तत्सम इतर अधिविभागातील प्रथम वर्ष पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यामधून मार्च / एप्रिल 2016 मध्ये झालेल्या संबधित विषयातील पदवी परीक्षेस सर्वाधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्याचे अथवा विद्यार्थीनीचे प्रत्येक अधिविभागातील एक नांव दिलेल्या प्रोफार्मामध्ये संचालक विद्यार्थी विकास यांचेकडे पाठवून द्यावयाचे आहे. सर्वाधिक गुणांचा विचार करताना संबंधित विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या पदवी परीक्षेतील भाग 1, पदवी परीक्षेतील भाग 2, पदवी परीक्षेतील भाग 3 च्या एकत्रित गुणांचा विचार करावयाचा आहे. उदा. बी.ए भाग 1, बी.ए. भाग 2 व बी.ए. भाग 3 असे तीन वर्षाचे एकूण गुण विचारात घेण्याचे आहेत.)

.....2

ब) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 व महाराष्ट्र शासन अध्यादेश क्रं. 28 नुसार मा. प्र–कुलगुरुंनी नियुक्त करावयाच्या विद्यार्थीनी प्रतिनिधीसाठी एका विद्यार्थीनीचे नांव

प्रत्येक विभागातून एम. ए./एम. एस्ससी./एम. कॉम. व तत्सम पदव्युत्तर वर्गातील भाग 1 व 2 मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थीनीमधून ज्यांना सन 2016–2017 या मागील वर्षाच्या परीक्षेत मिळालेले गुण एन.एस.एस., एन.सी.सी., क्रिडा व सांस्कृतिक उपक्रमामध्ये मिळालेले प्राविण्य याचा विचार करुन त्यातील एका विद्यार्थीनीचे नांव दिलेल्या प्रोफार्मामध्ये पाठवावयाचे आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदयाप्रमाणे विद्यापीठ (पदव्युत्तर) अधिविभाग विद्यार्थी मंडळावर (युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट स्टुडन्ट कौन्सिलवर) उपरोक्त (अ) व (ब) मध्ये नमुद केल्या प्रमाणे येथील संबंधित प्रत्येक पदव्युत्तर अधिविभागातील एका विद्यार्थ्याचे अथवा विद्यार्थीनीचे (शैक्षणिक गुणवत्तेवर) व सर्व अधिविभागातून (सर्व साधारण प्राविण्याचा विचार करुन) 2 विद्यार्थीनी प्रतिनिधींची अनुक्रमे मा. कुलगुरु व मा. प्र–कुलगुरु नियुक्त करणार आहेत.

उपरोक्तप्रमाणे नियुक्त केलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनी व इतर सदस्यांच्या नावाचा उल्लेख करुन ते स्थापन झाल्याची घोषणा **दिनांक. <u>15 जानेवारी, 2018</u>** रोजी केली जाणार आहे. तरी उपरोक्त (अ) व (ब) प्रमाणे आपल्या विभागातील विद्यार्थी अथवा विद्यार्थीनीची माहिती आपण **दिनांक <u>10 जानेवारी, 2018</u>** पर्यंत संचालक विद्यार्थी विकास यांचेकडे पाठवून द्यावी ही विनंती.

"विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळ" नियुक्त करण्यासाठी **दिनांक <u>10 जानेवारी, 2018</u>** पर्यंत आपणाकडून आलेली विद्यार्थी/विद्यार्थीनींची नावे मा. कुलगुरुंचे मान्यतेसाठी सादर करण्यात येतील. तरी आपण आपल्या विभागाची विहित नमुन्यातील विद्यार्थ्यांच्या नावाची माहिती उशीरात उशीरा **<u>10 जानेवारी, 2018 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत</u>** विद्यार्थी विकास विभागात पाठवून द्यावी. त्यानंतर पाठविलेल्या नावाचा समावेश विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळावरील सदस्य नियुक्ती मध्ये करता येणार नाही व या संदर्भात विद्यार्थ्याच्या तक्रारी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी विभाग प्रमुख म्हणून आपल्यावर राहील. कृपया याची नोंद घ्यावी. ही विनंती.

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

# अधिविभाग विद्यार्थी मंडळ

## नामनिर्देशन पाठविणेबाबत मा. विभागप्रमुख यांनी पहावयाच्या सुचना

1) प्रथम वर्ष पदव्युत्तर वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पदवी वर्ष भाग एक, दोन व तीन यांची एकत्रित गुणांची बेरीज करून त्यांचे अंतिम टक्केवारीसह यादी तयार करून त्यांचे गुणपत्रक, वयाचा दाखला प्रस्तावासोबत जोडून पाठविणेत यावा. तसेच प्रथम आलेला विद्यार्थी 25 वर्षे वयापेक्षा जास्त असल्यास 25 वर्षांच्या आतील विद्यार्थी त्याच्या खालील गुणानुक्रमे निवडण्यात यावा.

2) ज्या विभागाचे मल्टी फॅकल्टी मधून ॲडमिशन होते त्याठिकाणी प्रवेश परीक्षामध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे नांव नामनिर्देशन करण्यात यावे.

(उदा; एम.बी.ए., एम.सी.ए. संगणकशास्त्र, एम.सी.ए. कॉमर्स, एम.ए. मास कम्युनिकेशन, एम. एस.डब्ल्यू., बी.जे.सी., संगीत व नाटयशास्त्र, एम.टेक., फुड सायन्स, इ.)

3) विभागप्रमुखांनी नामनिर्देशन करावयाच्या विद्यार्थ्यांचे वय हे 25 वर्षाचे आतील असावे.

4) जे विद्यार्थी प्रवेश परीक्षातून निवडले जातील त्यांचे वय हे 25 वर्षापेक्षा जास्त असल्यास त्याच्या खालच्या विद्यार्थ्याचे नामनिर्देशन करण्यात यावे.

5) परिनियम – 443 ( 5 ) नुसार महिला प्रतिनिधी या भाग 1 व 2 यामधील असणाऱ्या कोणत्याही वर्गातील असू शकतात.